दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● रविवार दि.१२ एप्रिल २०२६ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक २२३ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Sunday 12 April 2026 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 223 ● Pages 4 ● Rate 4 Rs

### 'जस्टिस फॉर दादा' आंदोलनाची हाक

**मुंबई**–राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताला अडीच महिने उलटूनही तपासाचे सत्य अद्याप समोर आले नसल्याचा खळबळजनक आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी केला आहे. अजितदादांना न्याय मिळवून देण्यासाठी मी एकटाच पायऱ्यांवर बसलो, पण दुर्दैवाने इतर आमदारांची हवी तशी साथ मिळाली नाही, अशी खंत व्यक्त करत अमोल मिटकरींनी आता 'जस्टिस फॉर दादा' या मोहिमेद्वारे रणशिंग फुंकले आहे.आमदार मिटकरी यांनी एका 'लाईव्ह' संवादातून आपल्या मनातील सल बोलून दाखवली. ते म्हणाले, अधिवेशनाच्या काळात शंभुराज देसाई यांच्या साताऱ्याच्या प्रकरणावरून शिवसेना आणि राष्ट्रवादीचे ४० आमदार एकत्र आले. मात्र, मी जेव्हा अजितदादांच्या अपघाताच्या तपासासाठी विधिमंडळाच्या पायऱ्यांवर आंदोलनाला बसलो, तेव्हा विनंती करूनही कुणीही आले नाही. जर त्यावेळी सर्व आमदार एकवटले असते, तर आज तपासाचे चित्र वेगळे असते. दुर्दैवाने आम्ही ती वेळ गमावली.

# २३ वर्षांची प्रतीक्षा संपली! महिला व बाल विकास विभागात ८,६६९ पदांची मेगाभरती; आदिती तटकरेंची मोठी घोषणा

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या महिला आणि बाल विकास विभागात तब्बल दोन दशकांनंतर भरतीचा मार्ग मोकळा झाला आहे. गेल्या २३ वर्षांपासून प्रलंबित असलेला पदभरतीचा प्रश्न मार्गी लावत, सरकारने ८ हजार ६६९ नियमित पदे भरण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे विभागाच्या सक्षमीकरणाला नवी दिशा मिळणार असून कामकाजाचा वेग वाढणार आहे. महिला आणि बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी या निर्णयाची माहिती दिली असून, या मेगाभरतीमुळे विभागाचा चेहरामोहरा बदलणार असल्याचे त्यांनी सांगितले.विभागाने कामकाजाच्या सोयीसाठी विभागाची मोठी पुनर्रचना केली आहे. कालबाह्य झालेली जुनी पदे रद्द करून त्याऐवजी आधुनिक कामकाजासाठी आवश्यक अशी १६५ नवीन पदे निर्माण करण्यात आली आहेत. या फेररचनेनंतर विभागातील एकूण मंजूर पदांची संख्या आता ८,६६९ झाली आहे. विशेष म्हणजे, दैनंदिन कामकाजात गती आणण्यासाठी नियमित पदांसोबतच २ हजार ८४३ पदे बाह्ययंत्रणेमार्फत (आउटसोर्सिंग) भरण्याच्या प्रस्तावालाही प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे.

ग्रामीण आणि दुर्गम भागातील बालकांचे पोषण तसेच आरोग्य व्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी राज्य सरकारने एकात्मिक बाल विकास सेवा (खउउ्‌ड) योजनेअंतर्गत मोठा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. यामध्ये एकूण २ लाख २१ हजार ३२८ मानधनाधारित पदांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे. यामध्ये १ लाख १० हजार ६६४ अंगणवाडी सेविका आणि तितक्याच संख्येने मदतनीस पदांचा समावेश आहे. सरकारच्या या निर्णयामुळे गावपातळीवरील आरोग्य योजनांच्या अंमलबजावणीला मोठी गती मिळणार असून, अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या बळावर कुपोषणमुक्तीच्या लढाईला नवे बळ मिळणार आहे.विभागाच्या बळकटीकरणासाठी घेतलेला हा निर्णय महिला आणि बालकांच्या विकासासाठी मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास मंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्त केला आहे. तब्बल २३ वर्षांच्या प्रदीर्घ काळानंतर सरकारने घेतलेल्या या निर्णयामुळे महिला व बालकल्याण विभागाला नवी संजीवनी मिळाली आहे. तटकरे यांच्या मते, या सक्षमीकरणामुळे रखडलेल्या योजनांना केवळ गतीच मिळणार नाही, तर त्यांची अंमलबजावणी अधिक पारदर्शक आणि प्रभावीपणे तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचणार आहे.



## क्रांतीसूर्य महात्मा फुले यांचे विचार समाजासाठी प्रेरणादायी-सामाजिक कार्यकर्ते एकनाथ मस्के

**शिक्षणाची दारे खुली करणाऱ्या जोतिबांच्या कार्याचा वसा पुढे नेण्याचा एकनाथ मस्के यांचा निर्धार**

दैनिक वादळ वाता
**माजलगाव । प्रतिनिधी**

विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली... असा मूलमंत्र देऊन बहुजन समाज आणि स्त्रियांसाठी शिक्षणाची द्वारे खुली करणारे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती सामाजिक स्तरावर उत्साहात साजरी होत आहे. त्यानिमित्त त्यांचे कार्य आजही समाजासाठी दीपस्तंभासारखे मार्गदर्शक आहे, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते एकनाथ मस्के यांनी केले आहे. महात्मा फुले यांनी केवळ शिक्षणाचा प्रसार केला नाही, तर जातीभेद आणि अस्पृश्यतेविरुद्ध प्रखर लढा दिला. देशातील



पहिली मुलींची शाळा सुरू करून त्यांनी स्त्री शिक्षणाचा पाया रचला. शेतकऱ्यांचे प्रश्न असोत वा विधवांचे दुःख, प्रत्येक ठिकाणी जोतिबांनी आपल्या कार्यातून क्रांती घडवून आणली. सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून त्यांनी माणसाला गुलामगिरीतून मुक्त करून आत्मसन्मानाने जगण्याची शिकवण दिली. आजच्या आधुनिक काळातही महात्मा फुले यांचे विचार तितकेच प्रासंगिक आहेत. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणे आणि समाजात शैक्षणिक व सामाजिक प्रगती साधणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असे आवाहनही एकनाथ मस्के यांनी यावेळी केले आहे.

## माजलगावात समता, बंधुता आणि एकतेचा संदेश देणारी 'समता ज्योत रॅली'

**पोलिस प्रशासन आणि आंबेडकरी अनुयायांचा संयुक्त पुढाकार**

दैनिक वादळ वाता
**माजलगाव । प्रतिनिधी**

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त माजलगाव येथे 'समता ज्योत रॅली'चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. पोलीस प्रशासन, माजलगाव जि. बीड व समस्त शिव-फुले-शाहू-आंबेडकरी अनुयायी यांच्या संयुक्त विद्यमाने ही रॅली काढण्यात येणार आहे.दि. १३ एप्रिल २०२६ रोजी रात्री ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून रॅलीला सुरुवात होऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक, भिमनगर येथे समारोप होणार आहे. संविधानाद्वारे समतेची ज्योत प्रज्वलित करणाऱ्या डॉ.आंबेडकरांना अभिवादन करण्यासाठी ही रॅली आयोजित करण्यात आली आहे.या रॅलीत मोठ्या संख्येने सहभागी होऊन समता, बंधुता आणि सामाजिक एकतेचा संदेश देण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले



आहे. या कार्यक्रमासाठी गौरव इंगोले (उपविभागीय अधिकारी, माजलगाव), राहुल कुमार (भा.पो.से., पोलीस स्टेशन माजलगाव ग्रामीण) तसेच राहुल सुर्यतळ (पोलीस निरीक्षक, माजलगाव शहर) यांचे मार्गदर्शन लाभत आहे.समस्त शिव - फुले - शाहू - आंबेडकरी अनुयायांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून अभिवादन करावे, अशी नम्र विनंती आयोजकांनी केली आहे.

## मुकुंद नगर परिसरातील बेकायदेशीर अतिक्रमण हटवण्याची नागरिकांचे मागणी

दैनिक वादळ वार्ता
**देगलूर । प्रतिनिधी**

शहरातील देगाव रोडवरील मुकुंद नगर परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून एका इसमाने सरकारी जागेवर बेकायदेशीर टीनशेड उभारून अतिक्रमण केले आहे. या अतिक्रमणामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असून, हे अतिक्रमण तात्काळ हटवावे, या मागणीसाठी मुकुंद नगरवासीयांनी देगलूर नगर परिषदेच्या नगराध्यक्षांना लेखी निवेदन दिले आहे. निवेदनात नमूद केल्यानुसार, मुकुंद नगर भागात राठोड नावाच्या व्यक्तीने लोखंडी तारेचे कंपाउंड घालून व टीनशेड उभे करून मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण केले आहे. धक्कादायक बाब म्हणजे, ही जागा स्वतःच्या मालकीची असल्याचे भासवून संबंधित व्यक्ती हे गाळे भाडेतत्त्वावर देऊन त्यातून मोठी रक्कम वसूल करत आहे. या अनधिकृत बांधकामामुळे परिसरातून ये-जा करणाऱ्या लहान-मोठ्या वाहनांना अडथळा निर्माण होत असून, पादचाऱ्यांचीही मोठी गैरसोय होत आहे.चौकशी करून वसुलीची मागणी संबंधित व्यक्तीने आजवर बेकायदेशीररीत्या किती भाडे वसूल केले, याची सखोल चौकशी करून ती रक्कम जप्त करावी, अशी मागणीही नागरिकांनी केली आहे. या अतिक्रमणामुळे परिसरातील सार्वजनिक शिस्त बिघडली असून प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, असे निवेदनात म्हटले आहे.

आंदोलनाचा इशारा जर नगर परिषद प्रशासनाने या तक्रारीची दखल घेऊन संबंधित अतिक्रमणावर तात्काळ कारवाई केली नाही, तर मुकुंद नगर आणि देगाव रोड परिसरातील नागरिक नगर परिषद कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडतील, असा इशाराही यावेळी देण्यात आला आहे. या निवेदनावर सोनू बादावार, खुरीशी सलमान, वाघमारे संजय, सुनिल बादावार, पप्पु बादावार, गंगाधर उतेकर, इरफान शेख, शेख महेबुब, सचिन कांबळे, बालाजी कांबळे, अंबादास उतेकर, जिवन सोनकांबळे, हुसेन दवलताबादे, वाघमारे अजय, करीम शेख, रमेश बादावार यांच्यासह मुकुंद नगर व देगाव रोड परिसरातील अनेक नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## खा.डॉ.अजित गोपछडे यांच्या पुढाकारातून जि.प.प्रा.शाळा येरगी येथे ओपन जिम

दैनिक वादळ वार्ता
**देगलूर । धनाजी जोशी**

नांदेड जिल्हाचे राज्यसभा खासदार डॉ.अजित गोपछडे यांच्या माध्यमातून सीएसआर निधीतून तालुक्यातील चालुक्य कालीन नगरी येरगी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये ओपन जिम बसवण्यात आले. यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या ओपन जिममुळे शाळेतील विद्यार्थ्यांचे शरीर सुदृढ व निरोगी राहिल व तसेच विद्यार्थ्यांना व्यायामाची सवय लागण्यास मदत होईल.

शालेय विद्यार्थ्यांच्या स्वास्थ्यासाठी महत्वपूर्ण भूमिका घेऊन खा.गोपछडे



यांनी ही ओपन जिम जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येरगी शाळेसाठी मंजुर करून दिल्यामुळे सर्व विद्यार्थी व गावकऱ्यांच्या वतीने त्यांचे आभार मानण्यात आले.

सदरील ओपन जिम चे उद्घाटन जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकचे सुभाष पाटील थडके, उमाकांत पाटील थडके यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी सरपंच संतोष पाटील येरगीकर, ग्रामपंचायत सदस्य अशोक बरसमवार, विश्वनाथ बागेवार, अशोक वाघमारे,चेअरमन प्रभु चेंडके, मा.चेअरमन गणपत येरपलवार, वैजनाथ कालींगवार, बसवंत पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष सायलू कांबळे, शालेय शिक्षण समिती अध्यक्ष गजानन भोकसखेडे, मुख्याध्यापक नागोराव चव्हाण, मल्लिकार्जुन भोकसखेडे, माजी सरपंच चांदु कांबळे, शंकर वाघमारे, अशोक येरपलवार, प्रभाकर कालींगवार, भद्रु चेंडके, रमेश गटावार, नागनाथ बरसमवार, विठ्ठल कांबळे, विश्वनाथ भोकसखेडे, इरवंत कालिंगवार, मारोती सुर्यवंशी, शिक्षक वृंद, विद्यार्थी यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरीक व आजी माजी पदाधिकारी उपस्थित होते.

## डॉ.आंबेडकर जयंतीनिमित्त मोठी आई बहुउद्देशीय सेवा भावी संस्थेच्या वतीने जय भीम महोत्सवाचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**देगलूर । प्रतिनिधी**

येथे भारतरत्न डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही 'जय भीम महोत्सव- २०२६' उत्साहात साजरा केला जाणार आहे. मोठी आई बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या वतीने नागार्जुन बुद्ध विहार, सिद्धार्थ नगर येथे विविध सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. ११ एप्रिल २०२६ रोजी महोत्सवाची सुरुवात महामानवांचे चित्र या विषयावरील चित्रकला स्पर्धेने होणार असून दुपारी १ ते २ या वेळेत ही स्पर्धा पार पडेल. त्यानंतर १२ एप्रिल रोजी सकाळी ११ ते १२ या वेळेत अंनिसचे राज्य कार्यकारी समिती सदस्य इंजि. सम्राट हटकर यांच्या मार्गदर्शनाखाली



चमत्कार सादरीकरण आणि त्यामागील विज्ञान याविषयी प्रबोधनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे, ज्यातून वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. १३ एप्रिल रोजी नागरिकांसाठी मोफत बी.पी. आणि शुगर तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, त्याच दिवशी भव्य रांगोळी स्पर्धाही घेण्यात येणार आहे. या उपक्रमांमुळे आरोग्य जागरूकता आणि कलागुणांना वाव देण्याचा प्रयत्न आयोजकांकडून केला जात आहे. १४ एप्रिल रोजी जयंतीदिनी गुणवंतांचा सत्कार व स्पर्धांतील विजेत्यांचे बक्षीस वितरण करण्यात येणार आहे. सर्व स्पर्धा सर्वांसाठी खुल्या असून सहभागी स्पर्धकांनी आवश्यक साहित्य स्वतःसोबत आणणे अपेक्षित आहे. समाजप्रबोधन, आरोग्य आणि शिक्षणाचा संगम घडवणारा हा महोत्सव देगलूरकरांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी व नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन या कार्यक्रमाचे आयोजक पत्रकार विनय कांबळे यांनी केले.

## कोंबड्याने पेटविले दुकान!

**मामाने भाच्याचे दुकान पेटविले : इतर दुकानाला लागली आग;चार दुकानातील सामान जळून दीड लाखाचे नुकसान**

दैनिक वादळ वार्ता
**गौतम बचुटे । केज**

मामानेच आपल्या भाच्याच्या मंगलसेवा मंडप व डेकोरेशन दुकानाला पेट्रोल टाकून आग लावली. या आगीची झळ शेजारच्या तीन दुकाने देखील जळून खाक झाली. या प्रकरणी आगलाव्या मामा विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. केज शहरातील फुलेनगर येथील शुभम पिंटु मोरे या तरुणाच्या वडिलांचे बीड रस्त्यावर मंगलसेवा मंडप आणी डेकोरेशनचे दुकान आहे. ८ एप्रिल रोजी पहाटे ४.३० वा च्या दरम्यान शुभम मोरे याचा मामा गोविंद किसनराव कोंबडे याने पेट्रोल टाकून दुकान पेटविले. ही माहिती मिळताच शुभम मोरे आणि त्याचे चुलते सोमनाथ मोरे यांनी जाऊन आग विझविली. मात्र तो पर्यंत दुकानातील मंडप डेकोरेशनचे सामान, खुर्च्या १००, लाईटींग माळा ३०, दोन लाकडी टेबल, व रोकड जळून ४० ते ५० हजार रूपयाचे नुकसान झाले. तर शेजारी कृषी दुकानदार रघुनाथ बारगजे यांच्या दुकानातील लाईट फिटींग, फॅन बल्प जळून पाच हजार रूपयाचे नुकसान झाले. तर माऊली मेडीकल मधील लाईट फिटींग, इन्व्हाटर, फ्रिज जळून नुकसान झाले आहे. सर्वांचे एक ते दीड लाख रुपयांचे नुकसान झाले.शुभम मोरे यांच्या फिर्यादी वरून गोविंद कोंबडे विरुद्ध केज पोलीस ठाण्यात गु. र. नं. १८७/२०२६. भा. न्या. सं. ३२६(जी ) नुसार गुन्हा दाखल झाला आहे. सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक राजू वाघमारे हे तपास करीत आहेत.

**_आगलाव्या कोंबडे मामा झाला सीसीटीव्हीत कैद** :- गोविंद कोंबडे हा दुकानाला आग लावीत असताना दुकाना शेजारच्या चहाच्या हॉटेलच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात पेट्रोल टाकून दुकान पेटविताना कैद झाला.

# जिजाऊंचे विचार महिलांनीअंगिकारून स्वाभिमानी परिवार व समाज घडवावा-केंद्रीय मंत्री अनुप्रिया पटेल

## कुर्मी महासभेचे राष्ट्रीय अधिवेशन जबलपूर येथे उत्साहात संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**पालघर । प्रतिनिधी**

-जिजाऊंचे विचार महिलांनी अंगिकारून स्वाभिमानी परिवार व समाज घडवावा तसेच शिवाजी महाराजांचा व सरदार पटेल यांचे बुलंद विचार कुर्मी समाजाला सक्षम बनवतील, असे प्रतिपादन केंद्रीय मंत्री अनुप्रिया पटेल यांनी केले आहे.अखिल भारतीय कुर्मी क्षत्रिय महासभेचे राष्ट्रीय अधिवेशन व महिला राष्ट्रीय अधिवेशन नुकतेच मध्यप्रदेशातील जबलपूरमधील दाऊ मॅरेज गार्डन, महाराजपूर येथे पार पडले. यावेळी बोलताना अनुप्रिया पटेल यांनी समाजातील अनिष्ट प्रथा, परंपरा यांसह व्यसनाधिनता दूर झाली पाहिजे, असे आवाहनही यावेळी त्यांनी केले. तर समाजातील महिला सक्षम व स्वयंपूर्ण झाली तरच समाज सक्षम व स्वाभिमानी बनेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.यावेळी देशभरातून प्रत्येक राज्यातील समाजाचे पदाधिकारी व प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या अधिवेशनासाठी मंत्री आशिष पटेल, दशरथ पटेल, रामखिलावन पटेल, खासदार लता वानखेडे, ज्ञानेश्वर पाटील, राकेश सिंह यांसह कुर्मी महासभेचे राष्ट्रीय संरक्षक एल.पी.पटेल, राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.निरंजन प्रसाद, महासचिव उमेशकुमार पटेल, महिला अध्यक्षा लताऋषी चंद्राकर, युवा अध्यक्ष धीरज पाटीदार यांसह अन्य मान्यवर उपस्थित होते.

देशातील विविध राज्यांतील प्रांतीय पदाधिकारी आपल्या जिल्हाध्यक्षांसह सहभागी झाले होते. महाराष्ट्रातून प्रदेशाध्यक्ष संजय पाटील, महासचिव जयेश शेलार पाटील, कोषाध्यक्ष संदीप काळे पाटील, युवा अध्यक्ष प्रमोद ठोंबे पाटील, महिला प्रदेश अध्यक्षा डॉ. शोभाताई गायकवाड, उद्योग प्रकोष्ठ प्रदेश अध्यक्ष समीर पाटील यांसह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.यावेळी महाराष्ट्रातील पुरोहित प्रशिक्षक व पुरोहित प्रकोष्ठ कोकण प्रांताध्यक्ष विजय दलवी, कुर्मी पुरोहित डॉ. संदीप वरकुटे, संतोष भुसारे यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

तर या अधिवेशनात महाराष्ट्र कुर्मी समाजाचे माजी अध्यक्ष दिवंगत डॉ. बाबूलाल सिंह यांच्या स्मरणार्थ समाजासाठी उल्लेखनीय कार्य करणारे अजित राऊत (बोईसर) यांना जीवनगौरव, तुकाराम पष्टे (विरार) यांना वैद्यकीय सेवा रत्न, हरिदास आखरे (बुलढाणा) यांना विश्वभूषण संत तुकाराम महाराज पुरस्कार, प्रमोद ठोंबे (पुणे) यांना छ.संभाजी महाराज युवा रत्न, ड.गोपाल शेळके (रायगड) यांना राजर्षी शाहू महाराज सामाजिक पुरस्कार, निवृत्ती न्याहारकर (नाशिक) यांना कृषी रत्न, संजय गायकवाड (नाशिक) यांना शिक्षण रत्न, दिनेश दळवी (रत्नागिरी) यांना कृषी रत्न, विजय राव (टिटवाळा) यांना उद्योग रत्न, शाहीर उत्तम गायकर (इगतपुरी) यांना सांस्कृतिक कला रत्न तर संदीप काळे (नाशिक) यांना प्रशासकीय रत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या महाअधिवेशनात देशभरातील कुर्मितील विविध समाजांचा सहभाग होता. यामध्ये पटेल, पाटीदार, मराठा, कुनबी, कलबी, कुडुंबर, कूर्मि, देवेंद्र कुल वेल्लालर, महतो, गुर्जर, खंडायत, नायक, नायडू, कापू, चंद्राकार, अंजना समाज, कम्मा, ओक्का लिंगा, कुलमी आदी विविध समाजांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते.







## कन्हेरवाडी साठवण तलावातील पाणी नदीपात्रात सोडण्याच्या मागणी साठी परळी-अंबेजोगाई महामार्गावर जिरेवाडी बायपास येथे उद्या होणाऱ्या रास्ता रोको आंदोलनास मोठ्या संख्येने उपस्थित रहा-राजेभाऊ फड

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

कन्हेरवाडी साठवण तलावातील पाणी नदीपात्रात सोडण्याच्या मागणीसाठी परळी - अंबेजोगाई महामार्गावर जिरेवाडी बायपास येथे ९ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता परिसरातील ग्रामस्थांच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे. तरी या आंदोलनास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सरचिटणीस तथा कन्हेरवाडीचे माजी सरपंच राजेभाऊ फड यांनी केले आहे.



कन्हेरवाडी साठवण तलावातील पाणी नदीपात्रात सोडण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. पाण्याअभावी या भागातील जलाशय कोरडेठाक पडले आहेत. जनावरांना पाण्यासाठी वणवण भटकंती करावी लागत आहे. हा साठवण तलाव अतिशय डोंगराळ भागात असल्याने येथून टँकरने पाणी पुरवठा करणे शक्य होत नाही. त्यामुळे पाणी नदीपात्रात सोडणे हा एकमेव पर्याय आहे.

या साठवण तलावातील पाणी नदीपात्रात सोडल्यास याचा फायदा परिसरातील गावांना होतो. कन्हेरवाडी, जिरेवाडी, ब्रम्हवाडी, जलालपूर, बँक कॉलनी, समता नगर, शंकर पार्वती नगर आदी भागातील जळ पातळीत वाढ होऊन दुष्काळी परिस्थितीपासून दिलासा मिळणार आहे.या आग्रही मागणीसाठी कन्हेरवाडी व परिसरातील नागरीक ग्रामस्थांच्या वतीने परळी - अंबेजोगाई महामार्गावर जिरेवाडी बायपास येथे होणाऱ्या रास्ता रोको आंदोलनास आंदोलनास परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सरचिटणीस व कन्हेरवाडीचे माजी सरपंच राजेभाऊ फड यांनी केले आहे.

## राघवेंद्र शिंदे यांना जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणूक मतदानाचा अधिकार

**दैनिक वादळ वार्ता**
**हिमायतनगर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यातील सहकारी सहकारी संस्थांच्या निवडणुका राज्य निवडणूक प्राधिकरणाने जाहिर केल्याने हिमायतनगर शहरातील सेवा सहकारी सोसायटीच्या संचालक मंडळाची बैठक दि.६ एप्रिल रोजी पार पडली या बैठकीत नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक निवडणूक २०२६ साठी मतदानाचा अधिकार राघवेंद्र प्रकाशराव शिंदे यांना देण्यात यावा अश्या पध्दतीचा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणूक अनुषंगाने हिमायतनगर येथील सेवा सहकारी सोसायटीच्या वतीने बैठक घेण्यात आली या बैठकीत राघवेंद्र शिंदे यांना मतदानाचा अधिकार देण्यात यावा यासाठी उदय प्रभाकर देशपांडे यांनी सुचविले आणी त्यास सुभाष जिवनाजी शिंदे यांनी अनुमोदन दिल्याने हा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला असून त्यांची जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणूक मतदानासाठी बिनविरोध निवड झाल्याने तालुक्यातुन त्यांच्या निवडी बद्दल अभिनंदनाचा वर्षाव होत आहे निवड बैठकीत अध्यक्ष प्रविण प्रकाशराव शिंदे, संचालक उदय प्रभाकर देशपांडे,संदीप दत्तात्रय तुप्तेवार, दत्तात्रय कदम, विठ्ठल ताडेवाड,संजय माने, उत्तम ढोले, मारोतराव राऊत, सौ.शांताबाई चौरे, सुभाष शिंदे, आनंदराव देवकते,सौ. पुष्पाताई मुधोळकर सह सेवा सहकारी सोसायटीचे सचिव यांची उपस्थिती होती.




## डिजिटल लग्नपत्रिकांचा वाढता ट्रेंड; सोयीसोबत आत्मीयतेची उणीव आणि छपाई व्यवसायावर परिणाम

### एका क्लिकचे निमंत्रण : परंपरेचा स्पर्श हरवत चाललाय !

**दैनिक वादळ वार्ता**
**किनवट । प्रतिनिधी**

लग्न म्हणजे दोन व्यक्तींचा नव्हे, तर दोन कुटुंबांना जोडणारा जिव्हाळ्याचा सोहळा. पूर्वी लग्नाचे निमंत्रण देण्यासाठी नातेवाईकांच्या घरी जाऊन आग्रहाने पत्रिका देण्याची परंपरा होती. या भेटीतून नात्यांमध्ये आपुलकी आणि आदर वाढत असे. मात्र बदलत्या काळात डिजिटल माध्यमांचा वापर झपाट्याने वाढला आहे. आता 'सेव्ह द डेट' व्हिडिओ, ॲनिमेशन निमंत्रण आणि सोशल मीडियाद्वारे एका
क्लिकमध्ये शेकडो लोकांना निमंत्रण पाठवले जाते. ही पद्धत जलद आणि सोयीची असली, तरी पारंपरिक निमंत्रणातील आत्मीयता कमी झाल्याची भावना व्यक्त होत आहे.

ज्येष्ठ नागरिकांच्या मते, घरी जाऊन दिलेले निमंत्रण हे केवळ माहिती देणे नसून नात्यांना घट्ट करणारा भावनिक दुवा असतो. डिजिटल निमंत्रणात तो उबदारपणा जाणवत नाही, अशी खंत अनेकांनी व्यक्त केली. दरम्यान, या बदलाचा पारंपरिक छपाई फटका व्यवसायालाही बसत आहे. लग्नपत्रिकांची मागणी घटल्याने प्रिंटिंग प्रेसमध्ये काम कमी झाले असून कामगारांवर उपजीविकेचे संकट निर्माण झाले आहे. पूर्वी लग्नसराईत मोठ्या प्रमाणावर मिळणाऱ्या ऑर्डर्स आता लक्षणीयरीत्या कमी झाल्या आहेत. मात्र दुसरीकडे डिजिटल क्षेत्रात नव्या संधी निर्माण होत आहेत. ग्राफिक डिझाइन, व्हिडिओ एडिटिंग आणि सोशल मीडिया कंटेंट तयार करण्यामध्ये तरुणांना रोजगाराच्या नव्या वाटा खुल्या
झाल्या आहेत. एकंदरीत, डिजिटल सोयीमुळे वेळ आणि खर्च वाचत असला तरी नात्यांमधील जिव्हाळा
टिकवण्यासाठी पारंपरिक पद्धतींचा विचार करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.




## ऋचा बंडे हिला डॉ.होमी भाभा बालवैज्ञानिक कांस्य पदक

### मानवतच्या नेताजी सुभाष विद्यालयाच्या विद्यार्थिनीचा गौरव

**दैनिक वादळ वार्ता**
**परभणी । प्रतिनिधी**

ग्रेटर बॉम्बे सायन्स टीचर्स असोसिएशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या प्रतिष्ठित 'डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा २०२५-२६' मध्ये मानवत येथील नेताजी सुभाष विद्यालयाची इयत्ता सहावीची विद्यार्थिनी कुमारी ऋचा विनायक बंडे हिने घवघवीत यश संपादन केले आहे. या विज्ञान टॅलेंट सर्च स्पर्धेत ऋचाने आपल्या बुद्धिमत्तेची चुणूक दाखवत कांस्य पदक (Bronze Medal) पटकावले असून तिला 'बालवैज्ञानिक' पदवीने सन्मानित करण्यात आले आहे.छत्रपती संभाजीनगर विभागातून मराठी माध्यमातून शिक्षण घेणाऱ्या ऋचाने या कठीण स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केली. ऋचाला या यशासाठी शाळेतील विज्ञान शिक्षक श्री. गणेश बारहाते सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली तिने प्रयोगांची तयारी आणि वैज्ञानिक सिद्धांतांचा अभ्यास यशस्वीपणे पूर्ण केला होता. ५ एप्रिल २०२६ रोजी पार पडलेल्या सोहळ्यात तिला हे पदक आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.ऋचाच्या या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक संजय लाड यांनी तिचे विशेष कौतुक केले आहे. ऋचा विनायक बंडे हिने मिळवलेले हे यश शाळेसाठी अभिमानास्पद असून, बारहाते सरांचे मार्गदर्शन आणि ऋचाची जिद्द यामुळेच हे शक्य झाले आहे, अशा शब्दांत त्यांनी तिला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

ग्रेटर बॉम्बे सायन्स टीचर्स असोसिएशनचे अध्यक्ष अच्युतराव माने, सचिव डॉ. नीलिमा मुळगुंद आणि खजिनदार संदीप शिंदे यांनीही ऋचाच्या यशाचे कौतुक केले आहे. या यशाबद्दल संपूर्ण मानवत परिसरातून ऋचा आणि तिच्या मार्गदर्शकांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.




## डॉ.बाबासाहेब आंबेडकर बहुजन कर्मचारी समितीची बैठक उत्साहात संपन्न



**दैनिक वादळ वार्ता**
**लातूर । प्रतिनिधी**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर बहुजन कर्मचारी जयंती उत्सव समितीची बैठक महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात संपन्न झाली. या बैठकीला नवनियुक्त प्राचार्य प्रो.डॉ.सिद्राम डोंगरगे, प्रा.डॉ.बाळासाहेब गोडबोले, प्रा.डॉ.संजय गवई, प्रा.कल्याण कांबळे, ड.सुरेशचंद्र सलगरे, प्रा.संगमेश्वर पानगावे, गंगाधर शिनगारे आणि प्रा.प्रशांत उघाडे यांची उपस्थिती होती.बैठकीच्या प्रारंभी महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी प्रो.डॉ.सिद्राम डोंगरगे यांची नियुक्ती झाल्याबद्दल समितीच्यावतीने त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

या महिन्यात महात्मा जोतिबा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा बसवेश्वर या महापुरुषांच्या जयंत्या आहेत. तसेच वर्षभरात येणाऱ्या महापुरुषांच्या जयंत्या, पुण्यतिथी आणि विविध उपक्रम राबविण्याच्या दृष्टिकोनातून सविस्तर चर्चा करण्यात आली. समितीचे व्यापक उद्दिष्ट समोर ठेवून महापुरुषांच्या आठवणी आणि विचारधारा समाजातील प्रत्येक घटकापर्यंत रुजविण्याच्या अनुषंगाने समितती कार्यरत राहील असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

सर्व बुद्धीजीवी बहुजन कर्मचारी यांनी समितीत सहभागी होऊन समिती बळकट करणे काळाची गरज आहे, समितीच्या माध्यमातून विविध क्रीडा स्पर्धा, अनाथ, अंध, विद्यार्थ्यांसाठी सहाय्यपुरक उपक्रम, विविध व्याख्याने, कार्यशाळा, परिसंवाद आणि चर्चासत्र आयोजीत करण्याच्या उद्देशाने सर्वांनी मनोगते व्यक्त केली.तसेच व्यापक नियोजन करण्यासाठी पुढील बैठक शुक्रवार दि.१० एप्रील २०२६ रोजी सायं. ०५ वा. महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात आयोजित करण्याचे ठरविण्यात आले. या बैठकीचे सूत्रसंचालन, प्रास्ताविक आणि आभार प्रा.प्रशांत उघाडे यांनी केले.

### परळी शहरातील नगरपरिषद अतिक्रमण हटाव मोहीमेत मतभेद का?

## सर्वसमान अतिक्रमण हटाव मोहीम राबवा अन्यथा कायदेशीर रित्या न.प.कार्यालयासमोर उपोषण करणार-वैजनाथ फड

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

गेल्या अनेक वर्षांपासून परळी शहरातील जवळपास सर्वच रस्त्यांवर अतिक्रमणं मोठ्या प्रमाणावर झालेली आहेत. अतिशय सुटसुटीत व वाहतूकीला विना अडथळा होत असतांनाही वाहतूक कोंडी, अस्ताव्यस्त रचना आणि बेशिस्त पार्किंग यामुळे सर्वांनाच प्रचंड त्रास सहन करावा लागत लागत आहे. त्यामुळे आपणच आपले शहर सुटसुटीत आणि शिस्तबद्ध बनवण्यासाठी आता परळी नगर परिषद प्रशासनानेही धाडसी निर्णय घेतला आहे

परळी वैजनाथ नगरपरिषद अतिक्रमण हटाव विशेष मोहीम सुरु असून परळी शहरात वाढत्या अतिक्रमणांमुळे निर्माण झालेली वाहतूक कोंडी, अस्वच्छता आणि नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांच्या पार्श्वभूमीचर नगरपरिषद प्रशासनाने अतिक्रमण हटावाची विशेष मोहीम हाती घेतली आहे. शहरातील मुख्य रस्ते, फूटपाथ, नाले तसेच इतर सार्वजनिक ठिकाणांवर झालेले अतिक्रमण हटवून शहर सुटसुटीत आणि शिस्तबद्ध करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न सुरु आहेत नगरपरिषदे कडून जाहीर करण्यात आलेल्या सूचनेनुसार, शहरातील सर्व नागरिक, व्यावसायिक व दुकानदारावर गोरगरीब व्यापारी यांच्या समोरील अतिक्रमण काढण्याचा धूमधडाका सुरु असून हे अतिक्रमण मोठ्या. या निर्णयाबाबत आपला विरोध नसून गरीब श्रीमंत राजकीय व्यवसायिक यांना माफ करत सामान्य व्यापाऱ्यांची हॉटेल घर दुकानाची मोडतोड होत आहे असा गंम्भीर आरोप करत सरसकट अतिक्रमण एक लाईन हटाव मोहीम राबवा अन्यथा परळी नगर परिषद कार्यालया समोर कायदेशीर रित्या आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. माहितीस्तव राज्याचे मुख्यमंत्री. देवेंद्र फडणवीस. उपमुख्यमंत्री. एकनाथ शिंदे साहेब. उपमुख्यमंत्री. सुनेत्राताई पवार. तसेच जिल्हाधिकारी कार्यालय बीड. पोलीस अधीक्षक कार्यालय बीड. उपजिल्हा अधिकारी कार्यालय परळी न प. कार्यालय परळी यांना व्हिडीओसह.फोटो या पुराव्यासह निवेदन देऊन उपोषण करणार असल्याची माहिती दिली आहे.तरी

नगरपरिषद प्रशासनाने सर्व नागरिक आणि व्यापाऱ्यांना सर्व समान मतभेद नकरता सरसकट अतिक्रमण हटवावं असे आव्हान वैजनाथ फड यांनी केले आहे.



# पोलिसांना चावा घेतल्या प्रकरणी मस्साजोग येथील प्रवीण देशमुखला एक वर्षाची शिक्षा

## बसवर दगडफेक करताना पकडल्या नंतर घेतला दोन पोलिस कर्मचाऱ्यांना घेतला होता चावा

**दैनिक वादळ वार्ता**
**गौतम बचुटे । केज**

केज तालुक्यातील मस्साजोग येथे प्रवाशी घेण्यासाठी थांबलेल्या छत्रपती संभाजीनगर आगाराच्या शिवशाही बसवर दगडफेक करताना पोलिसांनी एकाला पकडल्या नंतर त्याने पोलिसांच्या तावडीतून सुटका करून घेण्यासाठी चक्क एका पोलिसाच्या हाताला व दुसऱ्या पोलिसाच्या गालाला चावा घेवून दोघांना जखमी केले होते. त्या प्रकरणी केज येथील जिल्हा अतिरिक्त सत्र न्यायालयाने एकाला एक वर्षाची शिक्षा व दंडाची शिक्षा सुनावली असून दुसऱ्याची पुराव्या अभावी निर्दोष मुक्तता केली आहे.

३ ऑगस्ट २०१८ रोजी छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) आगाराची शिवशाही बस ( एम एच ०९/ ई एम २४६७ ) ही लातूरहुन छत्रपती संभाजीनगरकडे जात असताना दुपारी ४.१५ वा. च्या सुमारास मस्साजोग येथे प्रवाशी घेण्यासाठी बस थांबली होती. त्यावेळी मद्यधुंद अवस्थेत आलेल्या प्रवीण श्रीधरराव देशमुख व रवींद्र जालिंदर देशमुख या तरुणांनी बसवर दगडफेक करीत बसच्या समोरच्या काचा फोडून चुराडा केला. या हल्ल्यात बसचे ४० हजार रुपयांचे नुकसान झाले होते. तर याच वेळी पेट्रोलिंग करून तेथून जात असलेले केज पोलीस ठाण्याच्या गुप्तचर विभागाचे तत्कालीन पोलीस कर्मचारी परमेश्वर वखरे व पोलीस नाईक अशोक गवळी या दोघांनी त्या एसटी बसवर दगडफेक करणाऱ्या इसमाचा पाठलाग करून प्रविण देशमुख यास पकडले होते. पोलिसांच्या तावडीतून सुटका करून घेण्यासाठी प्रवीण देशमुख याने या पोलीस कर्मचाऱ्याना धक्काबुक्की करून परमेश्वर वखरे यांच्या गालाला तर पोलिस गाडीत बसल्या नंतर पोलीस नाईक अशोक गवळी यांच्या हाताला चावा घेतला होता.

या प्रकरणी पोलीस नाईक परमेश्वर वखरे यांच्या फिर्यादी वरून प्रवीण देशमुख व रवींद्र देशमुख या दोघांविरुद्ध केज पोलिसात गुन्हा दाखल झाला होता. सहाय्यक पोलीस निरीक्षक श्यामकुमार डोंगरे यांनी या प्रकरणाचा तपास करून आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र दाखल केले होते. केज येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाचे न्यायाधीश श्रीमती आर. के. शेख यांच्या समोर १० एप्रिल रोजी अंतिम सुनावणी झाली. त्यांनी प्रत्यक्षदर्शी दोन साक्षीदार व इतर सहा साक्षीदारांची साक्ष व सहाय्यक सरकारी वकील ड. रविकुमार उदार यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून प्रवीण श्रीधरराव देशमुख यास एक वर्षाची शिक्षा व दोन हजार रुपये दंड ठोठावला. तर रवींद्र देशमुख यांची पुराव्या अभावी निर्दोष मुक्तता करण्यात आली. सरकारी पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील ड. रविकुमार उदार यांनी काम पाहिले. तर सहाय्यक सरकारी ड. वकील राम बिरंगळ यांनी त्यांना मदत केली. तसेच पैरवीकार म्हणून पोलीस नाईक रमा भालेराव यांनी काम पाहिले.

# महिलेस मारहाण करून जातीवाचक शिवीगाळ

## ट्रॉसिटीचा गुन्हा दाखल-आरोपी फरार

**दैनिक वादळ वार्ता**
**गौतम बचुटे । केज**

शेतात ज्वारीची कापणी करण्यासाठी जात असलेल्या महिलेला सार्वजनिक ठिकाणी काठीने व लाथा बुक्क्यांनी मारहाण करून जातीवाचक शिवीगाळ केल्याची घटना केज तालुक्यात घडली असून एका विरुद्ध ट्रॉसिटीचा गुन्हा दाखल झाला आहे. मात्र अद्याप पर्यंत आरोपी आरोपीला अटक करण्यात आलेली नाही.दि. ८ रोजी मंगल प्रदीप कांबळे ही महिला दुपारी २:३० च्या सुमारास अभिमान काशीनाथ चाळक यांचे शेतात ज्वारी खुडण्यासाठी जात असतांना गणेश विक्रम चाळक याने तिला मस्साजी जाधव यांच्या घरा समोर सार्वजनीक रस्त्यावर जातीवाचक शिवीगाळ केली. त्याला शिव्या देण्याचे कारण विचारताच तो म्हणाला की, त्याने मंगलचा नवरा प्रदीप कांबळे याला त्याने ४ हजार ५०० रु दिले आहेत. मी पैसे त्याला दिले आहेत तू मला विचारणारी कोण ? असे म्हणून त्याने मंगल कांबळे हिस काठीने मारहाण केली. तसेच शिवीगाळ करून केसाला धरून खाली पडून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.या प्रकरणी मंगल कांबळे यांच्या तक्रारी वरून गणेश विक्रम चाळक याच्या विरुद्ध केज पोलिस ठाण्यात गु. र. नं. १९२/२०२६ भा. न्या. सं. ११५(२),११८,(१) ३५१(२), ३५२ यासह ट्रॉसिटीचे कलम ३(१) (आर), ३(१) (एस), ३(३) (व्ही ए) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याचा तपास सहाय्यक पोलिस अधीक्षक व्यंकटराम हे करीत असून अद्याप आरोपीला अटक करण्यात आलेली नाही.

# बनसारोळा येथे महात्मा जोतिबा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त शालेय साहित्य वाटप



**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील बनसारोळा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत महात्मा जोतिबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त अरविंद महादेव गोरे यांच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यां मध्ये शिक्षणाविषयी उत्साह निर्माण झाला आहे.कार्यक्रमाच्या सुरुवातीला महात्मा जोतिबा फुले व सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वही,पेन आदी शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाच्यामाध्यमातून समाजात केलेल्या परिवर्तनाचे महत्त्व सांगितले. विद्यार्थ्यांनीही या महान व्यक्तिमत्त्वांच्या विचारा पासून प्रेरणा घेऊन शिक्षणाच्या माध्यमातून प्रगती साधावी,असे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमास बजरंग बप्पा काकडे,नंदू कावळे, भुजंग गायकवाड,सुधीर रानमारे,अरविंद गोरे, राजाभाऊ धायगुडे,बापू कावळे,अनिल जोगदंड, मारुती नवघन यांच्यासह शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद,ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# भिंतीपत्रकातून विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला वाव;आदर्श विद्यालयात जयंतीनिमित्त प्रेरणादायी उपक्रम



**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती निमित्त आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बनसारोळा येथे भिंती पत्रक उपक्रमाचे उत्साहात आयोजन करण्यात आले.या उपक्रमामध्ये शाळेतील विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेचा आणि लेखन कौशल्याचा उत्कृष्ट नमुना सादर करत विविध विषयांवर सुंदर व माहितीपूर्ण लेख तयार केले.विद्यार्थ्यांनी स्वतःच्या शैलीत सादर केलेले हे लेख आकर्षक सजावटीसह भिंतीपत्रका वर प्रदर्शित करण्यात आले.या भिंतीपत्रकाचे अनावरण ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी पठाण मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या वेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री.काकडे बालासाहेब सर तसेच सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.या उपक्रमासाठीविद्यार्थ्यांना सांस्कृतिक विभाग प्रमुख संतोष रोकडे सर यांनी मार्गदर्शन केले.त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांनी दर्जेदार आणि आशयपूर्ण लेखन सादर केले.भिंतीपत्रक उपक्रमामुळे विद्यार्थ्यां मध्ये वाचन-लेखनाची आवड वाढीस लागून त्यांच्या सर्जनशीलतेला नवे व्यासपीठ मिळाले आहे.भिंतीपत्रक स्पर्धेत सर्वच लेख उत्कृष्ट होते. त्यामधून प्रथम क्रमांक अपूर्वा अशोक पारेकर, द्वितीय क्रमांक साधना ज्ञानेश्वर स्वर्णकार तर तृतीय क्रमांक अपूर्वा अविनाश काळे यांनी पटकावला.विजेत्या विद्यार्थ्यांना शाळेचे आदर्श शिक्षक जगन्नाथ काळे सर हे बक्षिसे देणार आहेत अशी माहिती संतोष रोकडे यांनी प्रतिनिधीशी बोलताना दिली आहे.

# जसा लातूर पॅटर्न,तसाच केज पॅटर्न नावारूपास येतोय-पत्रकार मधुकर सिरसट

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**



शाहु कॉलेजच्या स्क्रीनिंग टेस्ट परीक्षेत,केज येथील आवाड एज्युकेशनल अँकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी बाजी मारली असून, यावर्षी या परीक्षेत ए ई ए च्या १३ विद्यार्थ्यांनी पहिल्याच यादीतून शाहू कॉलेजला ८ व संत तुकाराम कॉलेजला ५ अशा एकूण १३ गुणवंत विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.त्यामूळे जसा लातूर पॅटर्न,राज्यात गाजला आहे,तसा केज पॅटर्नही नावारूपास येतोय असे विचार केज येथील आवाड एज्युकेशनल अँकॅडमी मध्ये पार पडलेल्या गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभात अध्यक्षीय समारोप करताना पत्रकार मधुकर दादा सिरसट बोलत होते.

राजर्षी शाहु कॉलेजची स्क्रीनिंगची परीक्षा म्हणजे महाराष्ट्रातील ११वी च्या प्रवेशासाठीची सर्वात मोठी परीक्षा असते कारण या परीक्षेला पंधरा-वीस हजार परीक्षार्थी १२० जागांसाठी चुरशीने अभ्यास करतात.मिनी नीट समजल्या जाणाऱ्या या परीक्षेत दरवर्षी आवाड एज्युकेशनल अकॅडमीचे विद्यार्थी मोठ्या प्रमाणात निवडले जातात.यावर्षी ही या परीक्षेत ए ई ए च्या १३ विद्यार्थ्यांनी पहिल्याच यादीतून प्रवेश मिळवला. असून त्यापैकी ८ विद्यार्थी शाहू कॉलेज व ५ विद्यार्थी संत तुकाराम कॉलेजसाठी निवड झाली आहे.या वेळी प्रमुख पाहूणे म्हणून प्राचार्य डॉ.हनुमंत सौदागर,प्रा.चंद्रकांत डांगे व जाधव सर हे व्यासपीठावर हजर होते. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी ही शाहु कॉलेजच्या स्क्रीनिंग टेस्ट परीक्षेत, आवाड एज्युकेशनल अँकॅडमीच्या आकांक्षा सांजुरे,श्रावण चाटे, अपेक्षा आढाव,विराट बांगर,श्रेयश बनसोडे, प्रज्ञा घुले,आदित्य मुळे, हिंदवी यादव या ८ विद्यार्थ्यांची शाहू कॉलेज साठी तर ज्ञानदा गायकवाड,सई साखरे, सलोनी रिणवा,आयुष सातपुते,अद्वैता राऊत या पाच विद्यार्थ्यांची संत तुकाराम महाविद्यालया साठी निवड झाली आहे. प्रास्ताविक आवाड एज्युकेशन अँकँडमीचे संचालक प्रा.डॉ.विठ्ठल आवाड यांनी केले.व यश हे केज मधील शैक्षणिक वातावरणामुळे व टीम वर्कमुळे मिळाल्याचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला.यावेळी प्राचार्य डॉ. हनुमंत सौदागर,चंद्रकांत डांगे सर आणि जाधव सर यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.यशस्वी विद्यार्थ्यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना अँकॅडमीच्या फाऊंडेशन व सराव परिक्षेचा खूप फायदा झाल्याचे सांगीतले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन सौ.सीमा आवाड यांनी केले.या प्रसंगी आवाड अकॅडमीचे शिक्षक, शिक्षिका,पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महात्मा ज्योतिबा फुले समग्र क्रांतीचे प्रणेते-आनंद भैय्या गायकवाड

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**



स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता.केज जि.बीड येथे दि. ११ एप्रिल २०२६ रोजी महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.यावेळी व्याख्यान,परिसंवाद, ग्रंथवाचन आदी कार्यक्रम घेण्यात आले.सर्वप्रथम महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पुजन व वंदन करण्यात आले.व्याख्यान देताना महात्मा ज्योतिबा फुले हे समग्र क्रांतीचे प्रणेते होते असेप्रतिपादन ग्रंथालयाचे आनंद भैय्या गायकवाड यांनी केले.

अध्यक्षस्थानी ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष,जेष्ठ विचारवंत,जेष्ठ समाज सेवक,महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध वक्ते व परखड व्याख्याते प्राचार्य,डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड हे होते.परिसंवादात शिवतेज गायकवाड, शिवराज जाधव,आनंद गायकवाड,रविंद्र गायकवाड पेंटर, नानासाहेब जाधव, अजिंक्य तट यांनी सहभागी होऊन मार्गदर्शन केले.तर ग्रंथवाचन वेदिका गायकवाड,कल्याणी घोगले,शिवम गायकवाड,शिवराज भोगजकर,यशराज भोगजकर,कृष्णराजे गायकवाड यांनी सहभागी होवून ग्रंथवाचन केले.अध्यक्षीय समारोप डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केला. मोठ्या संख्येने वाचक, हितचिंतक,विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

# केजचे तहसीलदार राकेश गिड्डे यांच्या अपघाताची चौकशी करण्यात यावी,प्रितम खरात यांची मागणी

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**



केज चे तहसीलदार राकेश गिड्डे यांचा रेणापूर फाट्याजवळ अचानक गाडीचा अपघात झाल्याची बातमी ही सर्व केज तालुक्यातील सर्व सामान्य नागरिक तसेच सर्व कर्मचारी यांना एक प्रकारे झोपेत दगड पडावा अशी वाऱ्या सारखी पसरली.अपघात होण्याच्या दोन ते तीन दिवसांच्या कालावधीत त्यांचे कोणासोबत कॉल या व्हॉट्सअप कॉल वर बोलणे झाले आहेत. याची सर्व कॉल रेकॉर्ड काढावे तसेच ज्या क्षणी ते लातूर हायवे लगत जो टोलनाका आहे तो किती वाजता पार केला त्याचा सीसीटीव्ही तपासून पोस्टमार्टम रिपोर्टनुसार अपघात किती वाजता झाला याची डिटेल डॉक्टर यांनी नोंद केली असेल त्या प्रमाणे तपासून जो कालावधी त्यांच्या गाडीने टोलनाका पारकेल्यापासून अपघात स्थळ आहे तिथपर्यंत जायला किती टाईम लागतो.जर अपघात झाल्याचा टाईम आणि टोलनाका टाईम यामध्ये किती अंतर होते तर ते अंतर पार करण्यासाठी मोजून दहा ते पंधरा मिनिटे लागतात.जर या कालावधीत काही तफावत असेल तर मधल्या वेळात त्यांची गाडी कोणत्या ठिकाणी थांबली होती का? कोणी सोबत होते का?जर कुठ थांबले असतील तर रोड लगत असलेली हॉटेल असतील या दुकाने यामध्ये त्यांच्या गाडी मागे कोणाची गाडी पाठलाग करताना दिसून येते का?यासाठी जेवढे रोड लगत कॅमेरा बसवलेले असतील हॉटेलची या दुकाने यांची तर ते पूर्ण तपासून घ्यावी जेणेकरून या प्रकरणाचा छडा लागेल,जर काही आढळून आले तर योग्य ती चौकशी करावी असे अनेक प्रश्न समोर येत आहेत.चौकशी ही एस आय टी मार्फत करण्यात यावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे केज तालुका उपाध्यक्ष प्रितम खरात यांनी केली आहे.

# मोगरगा येथे अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा साजरा

**दैनिक वादळ वार्ता**
**औसा । प्रतिनिधी**



औसा तालुक्यातील मोगरगा येथे गेल्या ३५ वर्षापासुन ग्रामदैवत केदारलिंग महाराज यांच्या यात्रे निमीत्त अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी परायण सोहळा आयोजीत केला जातो ,मोगरगा हे गाव संताची भुमी व सांप्रदायांचा वारसा लाभलेल गाव मनुन मोगरगा गावची ओळख आहे ,या गावातील ग्रामदैवत केदारलिंग महाराज या देवाची ख्याती खुप मोठी असुन केदारलिंग महाराज हा देव नवसाला पावणारा देव मनुन ही ओळखल जात, प्रत्येक वर्षी केदारलिंग महाराजांची यात्रा साजरी केली जाते यात्रेचे औचित्य साधुन गावातील लेकमाता ,व नौकरीसाठी बाहेरगावी असलेले गावातील ग्रामस्थ केदारलींग यात्रेसाठी गावी येत असतात व मोगरगा सह परीसरातील हजारो भाविक केदारलिंग महाराज यात्रेसाठी आवर्जुण मोगरगा येथे उपस्थीत राहतात व केदारलिंग महाराजांचे मनोभावे दर्शन घेतात ,मोगरगा येथील अखंड हरिनाम सप्ताहात रामायनाचार्य ह.भ.प दिनकर महाराज यांच्या सुश्राव्य वाणीतुन भाविकासाठी रामकथेच आयोजन करण्यात आले होते,यावेळी रामायनाचार्य ह.भ.प दिनकर महाराज निकमव्यासपिठ अधिकारी ह.भ.प भगवान महाराज टोंपे,दिलीप रुबदे , सरपंच रवि निकम ,उपसरपंच संभाजी मुळजे ,तातेराव निकम,अरविंद निकम ,शशिकांत क्षिरसागर ,शिवाजी महाराज उत्का,प्रशांत महाराज निकम ,चोपदार सतिश लकडे ,अंगद जळकोटे,चंद्रकांत बनसोडे,तानाजी चांदुरे,ऊद्धव रुब्दे,सुमीत निकम. कैलास गिरी,रोहन हासकुडे.डिगंबर चांदुरे ,वैभव हासकुडे,प्रथमेश निकम ,मधुकर निकम ,सुमित येवते ,प्रणव सोनवने,ओम लकडे ,तानाजी पाटील ,मारुती सोनवने ,दत्ता पाटील ,सुधाकर सोनवने ,प्रशात पाटील ,सरपंच रवि नीकम ,निवृती टोंपे ,रघुनाथ चांदुरे ,मधुकर निकम ,अंगद जळकोटे ,पप्पु पांचाळ ,शिवाजी निकम ,सह मोगरगा येथील केदारलींग महिला व पुरुष भजनी मंडळ सह सप्ताहात सात दिवस चहा पाणी व्यवस्था व यात्रेत ,केदारलिंग मित्र मंडळ मोगरगा यांच्या वतिने सेवा अपर्ण करण्यात आली ,

# मंगळवार पासुन दहीफळ येथील वडमाऊलीदेवीच्या यात्रेचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील दहीफळवडमाऊली येथे ब दर्जा प्राप्तचे तिर्थक्षेत्र असलेल्या वडजुआई (वडमाऊली) देवीचा यात्रा महोत्सव दरवर्षी प्रमाणे यावर्षीही मंगळवार दि.१४ एप्रिल ते १८ एप्रिल शनिवार या दरम्यान होत असलेल्या या यात्रे निमित्त ग्रामीण भागातील रशिक बांधवांच्या मनोरंजानासाठी आराधी गिते व सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.भावीक भक्तानी या यात्रेत मोठ्या संख्येने सहभागी होऊन यात्रेची शोभा वाढवावी अशी विनंती वडमाऊली देवस्थानचे अध्यक्ष येडूनाना ठोंबरे,सचिव भिकचंद ठोंबरे (सावकार), कोषाध्यक्ष हारीमास्तर ठोंबरे, सदस्य गंगाधर गदळे,बन्सी ठोंबरे रामहारी ठोंबरे व इतर सदस्यांसह गावक-यांनी केली आहे.
केज तालुक्यातील दहीफळ वडमाऊलीयेथे ब दर्जा असलेले तिर्थक्षेत्र वडजुआई (वडमाऊली) देवीचे मंदीर आहे.दरवर्षी चैत्र महीन्यातील अष्टमी पासुन या यात्रेला सुरुवात होते. दरवर्षी



प्रमाणे यावर्षीही दि.१४ एप्रिल मंगळवारी सकाळीदेवीची पालखी दहीफळ येथून बँड लेझीम पथक व आराधी मंडळीदेवीची गाणे गाऊन पालखी महोत्सवात सहभागी होतात.या वडजुआई (वडमाऊली) देवीला महीला पुरणपोळीचा नैवद दाखवुन सुवासीनी जेवणाचा कार्यक्रम करतात.

यात्रेनिमित्त दहीफळवड माऊलीयेथील माजी पंचायत समीती सदस्य दत्तात्रय (पिंटु) ठोंबरे,वडमाऊली देवस्थानचे अध्यक्ष येडूनाना ठोंबरे,सचिव भिकचंद ठोंबरे (सावकार),सदस्य हारीमास्तर ठोंबरे,सदस्य गंगाधर गदळे,बन्सी ठोंबरे,रामहारी ठोंबरे सह सर्व सदस्यांनी व गावक-यांनी पुढाकार घेऊन ग्रामीण भागातील जनतेच्या मनोरंजनासाठी १४ एप्रिल मंगळ- वारी संध्याकाळी आठ वाजता सांस्कृतीक कार्यक्रम व देवीमंदीर परिसरात आराधी गितांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.बुधवारी व गुरुवारी संध्याकाळी आराधी गीताचा कार्यक्रम आयोजित केला आहे. दि.१७ एप्रिल शक्रवारी संध्याकाळी वडमाऊली देवी मंदीर परीसरात देवीचा (छबीना) पालखी
मिरवणूक होईल तर.दि.१८ एप्रिल शनिवारी संध्याकाळी दहिफळ गावात देवीचा (छबिना) पालखी मिरवणूकीने यात्रेची सांगता होणार आहे.या आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमात यात्रेकरु भावीक भक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन यात्रेची शोभा वाढवावी अशी विनंती वडमाऊली देवस्थानचे अध्यक्ष येडू (नाना) ठोंबरे,सचिव भिकचंद ठोंबरे (सावकार),कोषाध्यक्ष हारीमास्तर ठोंबरे,सदस्य गंगाधर गदळे,
रामहारी ठोंबरे,बन्सी ठोंबरे सह इतर सदस्यांसह गावक-यांनी केली आहे.

**दहिफळ वडमाऊली यात्रेत येणा-या व जाणा-या प्रवाशांची सोय व्हावी यासाठी वडमाऊली देवस्थानचे अध्यक्ष,सचिव, कोषाध्यक्ष यांनी किल्ले धारुर व बीड आगार प्रमुख यांच्याकडे लेखी पत्र देऊन त्यांना वडमाऊली देवी यात्रा स्पेशल बसेस सोडण्याची मागणी केली आहे.**

**दहिफळ वडमाऊली यात्रेत येणा-या व जाणा-या भाविक भक्त व महिलांची मोठ्या संख्येंने सहभागी होतात.यात्रेत वादतंटा होऊ नये व यात्रा शांततेत पार पडावी म्हणून वडमाऊली देवस्थानचे अध्यक्ष,सचिव, कोषाध्यक्ष यांनी केजचे पोलीस निरिक्षक स्वप्निल उनवणे यांच्याकडे एका लेखी अर्जातून वडमाऊली यात्रेसाठी चोख पीलीस बंदोबस्त व आर.सी.एफ.पथक देण्याची मागणी केली आहे.**

# बहुजननायक महात्मा जोतिबा फुले यांचे विचार समाजाला दिशादर्शक-रमेश पोकळे

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

समाजातील विषमता नष्ट करून तळागाळातील समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी बहुजननायक, थोर समाजसुधारक आणि महामानव महात्मा जोतिराव फुले यांनी कार्य केले. त्यांच्या विचारांनी सदैव समाजाला योग्य दिशा दिली असून, त्यांचे कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन संस्था अध्यक्ष रमेश पोकळे यांनी केले.येथील वसंतराव काळे पत्रकारिता व संगणकशास्त्र महाविद्यालयात बीड आणि संभाजी राजे ग्रंथालय व व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालय बीड येथे महात्मा जोतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाला संस्था सचिव प्रा गणेश पोकळे, प्रा. बप्पासाहेब हावळे यांची प्रमुख उपस्थिती



होती.पुढे पोकळे म्हणाले की, महात्मा फुले यांनी शिक्षण, समता आणि सामाजिक न्याय यासाठी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांनी स्त्रीशिक्षणाची मुहूर्तमेढ रोवून समाजातील वंचित घटकांना उभारी दिली. आजच्या पिढीने त्यांच्या विचारांचा अंगीकार करून समाजहितासाठी कार्य करणे गरजेचे आहे.यावेळी त्यांनी महात्मा फुले यांचा विचार उद्धृत करत सांगितले की, सत्याच्या वाटेवरती चालत असताना एकटे पडलात तरी चालेल; पण चुकीच्या गोष्टींचे समर्थन करणाऱ्या गर्दीमध्ये मिसळू नका. हा संदेश प्रत्येकाने जीवनात आचरणात आणणे आवश्यक आहे, असेही त्यांनी नमूद केले.यावेळी मान्यवरांच्या हस्ते महात्मा जोतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.
या कार्यक्रमाला प्रा. सुहास गाढवे, प्रा.अफरोज सय्यद, प्रा. महेश नेवडे, दिपक जाधव, संध्या खोसे,शंकर इंगोले, सचिव चौरे व विद्यार्थी उपस्थित उपस्थित होते.

# पुंनदगाव येथे भव्य 'अखंड हरिनाम सप्ताह' व 'श्रीमद् भागवत कथा' सोहळ्याचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील पुंनदगाव येथील श्री केदारनाथ देवालयाच्या प्रांगणात समस्त ग्रामस्थ मंडळी व केदारनाथ भक्त परिवाराच्या वतीने १० व्या वर्षात पदार्पण निमित्त भव्य 'अखंड हरिनाम सप्ताह, श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळा आणि संगीत श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा शनिवार, ११ एप्रिल २०२६ ते शुक्रवार, १७ एप्रिल २०२६ या कालावधीत मोठ्या उत्साहात पार पडणार आहे.कार्यक्रमाचे स्वरूप सप्ताहाच्या काळात दररोज पहाटे ४ ते ६ काकडा भजन, सकाळी ७ ते ११ श्री ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी ११ ते २ भागवत कथा, दुपारी २ ते ४ अन्नदान, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ आणि रात्री ८ ते १० या वेळेत महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांची कीर्तने रंगणार आहेत.प्रख्यात कीर्तनकारांची मांदियाळी या सप्ताहात दररोज रात्री ८ वाजता विविध महाराजांची कीर्तने होतील:
दि. ११ एप्रिल: श्री ह.भ.प. विनोदाचार्य राजेंद्र महाराज सरवदे (शंकनपुरी)
दि. १२ एप्रिल: श्री ह.भ.प. बाल कीर्तनकार यशराज महाराज नाईकवाडे (बीड)
दि. १३ एप्रिल: श्री ह.भ.प. ज्ञानेश्वरी कंठस्थ भागवत महाराज बादाडे (काडीवडगाव)
दि. १४ एप्रिल: श्री ह.भ.प. भागवताचार्य कल्याण महाराज देवडकर (रामगाव)
दि. १५ एप्रिल: श्री ह.भ.प. विनोदाचार्य दिगंबर महाराज नखाते (हादगाव)
दि. १६ एप्रिल: श्री ह.भ.प. भागवताचार्य अशोक महाराज चिंगुरे (गोविंदपूर)
दि. १७ एप्रिल: श्री ह.भ.प. शब्दप्रभू अनिल महाराज पाटील (बार्शीकर) यांचे दुपारी १२ ते २ या वेळेत काल्याचे कीर्तन होऊन सप्ताहाची सांगता होईल.मार्गदर्शक व आयोजक
या संपूर्ण सोहळ्याचे संस्थापक मार्गदर्शक व भागवत कथा प्रवक्ते श्री ह.भ.प. परमेश्वर महाराज कुरे हे आहेत. तसेच श्री ज्ञानेश्वरी पारायण व्यासपीठ चालक म्हणून श्री ह.भ.प. विठ्ठल महाराज आंबुरे हे जबाबदारी सांभाळणार आहेत.
सप्ताहाच्या कालावधीत दररोज दुपारी महाप्रसादाचे आयोजन समस्त ग्रामस्थ मंडळी पुंनदगाव यांच्या वतीने करण्यात आले आहे. या आध्यात्मिक सोहळ्याचा लाभ घेण्याचे आवाहन विनीत व्यवस्थापक व समस्त केदारनाथ भक्त परिवार, पुंनदगाव यांनी केले आहे.



**माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयामध्ये महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करताना कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी (नाना) मोरे सचिव हरिभाऊ सवणे साहेब व सर्व अधिकारी कर्मचारी बांधव.**

# स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिरात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

शाळेतील ७ विद्यार्थ्यांची राजर्षी शाहू महाविद्यालय व संत तुकाराम महाविद्यालय लातूर येथे स्क्रीनिंग टेस्ट द्वारे निवड विद्यार्थ्यांचा शुक्रवार रोजी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष जीबी गदळे प्रमुख पाहुणे डॉ हनुमंत सौदागर, संस्थेचे उपाध्यक्ष नईमोद्दीन इनामदार ,मुख्याध्यापक वसंत शितोळे आदींची उपस्थिती होती. यावेळी बोलताना डॉ सौदागर म्हणाले अभ्यासाने सर्व काही शक्य होते.ध्येयपूर्तीसाठी सातत्य पूर्वक प्रयत्न केल्यास यश निश्चित प्राप्त होते असे मत व्यक्त केले. राजर्षी शाहू महाविद्यालय



लातूर स्क्रीनिंग टेस्टमध्ये- श्रावण रामदास चाटे, आकांक्षा दीपक सांजुरे, प्रज्ञा दिनकर घुले, श्रेयश रघुनाथ बनसोडे या विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. तर संत तुकाराम महाविद्यालय लातूर स्क्रीनिंग टेस्टमध्ये- सई बालाजी साखरे, ज्ञानदा सुनील गायकवाड, आयुष जयप्रकाश सातपुते यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास सहशिक्षक श्री मंगरुळकर,श्री चौरे,श्री भालेकर,श्री भालेकर,श्रीमती लोंढे,श्रीमती केंद्रे यांच्यासह शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती देशपांडे यांनी केले तर आभार श्री चोले यांनी व्यक्त केले.

# शिळवणी येथील वीज पडून मृत्यू झालेल्या मुलीच्या कुटुंबाला शासन आणि लोकप्रतिनिधींचा मदतीचा हात

दैनिक वादळ वार्ता
**देगलूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील शिळवणी येथील कु. दीपिका संजय राठोड हिचा वीज कोसळून झालेला दुर्दैवी मृत्यू अत्यंत वेदनादायी असून, या कठीण प्रसंगात शासन आणि लोकप्रतिनिधी कुटुंबाच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत.या दुर्दैवी घटनेची दखल घेत आज आमदार जितेश भाऊ अंतापूरकर आणि उपजिल्हाधिकारी अनुप पाटील यांनी शिळवणी येथे भेट देऊन राठोड कुटुंबाचे सांत्वन केले. यावेळी मृत



मुलीच्या कुटुंबियांना शासनाकडून मंजूर झालेली आर्थिक मदतीचा धनादेश सुपूर्द करण्यात आला.

आमदार अंतापूरकर यांनी यावेळी उपस्थित महसूल आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांशी चर्चा करून, पीडित कुटुंबाला इतर आवश्यक ती सर्व शासकीय मदत तातडीने मिळवून देण्याच्या सूचना दिल्या. दीपिकाचा अकाली मृत्यू हा संपूर्ण गावासाठी चटका लावून जाणारा आहे. ईश्वर तिच्या आत्म्यास शांती देवो आणि या दुःखातून सावरण्याची शक्ती तिच्या परिवाराला मिळो, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.
याप्रसंगी गावातील मान्यवर, ग्रामस्थ, प्रशासनातील विविध विभागांचे अधिकारी आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

# महात्मा जोतिबा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त शालेय साहित्य वाटप



दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील बनसारोळा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत महात्मा जोतिबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अरविंद महादेव गोरे यांच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी उत्साह निर्माण झाला.कार्यक्रमाच्या सुरुवातीला महात्मा जोतिबा फुले व सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वही, पेन आदी शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.
या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाजात केलेल्या परिवर्तनाचे महत्त्व सांगितले. विद्यार्थ्यांनीही या महान व्यक्तिमत्त्वांच्या विचारांपासून प्रेरणा घेऊन शिक्षणाच्या माध्यमातून प्रगती साधावी, असे आवाहन करण्यात आले.कार्यक्रमास बजरंग बाप्पा काकडे, नंदू कावळे, भुजंग गायकवाड, सुधीर रानमारे, अरविंद गोरे,राजाभाऊ धायगुडे, बापू कावळे,अनिल जोगदंड, मारुती नवघन यांच्यासह शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# मस्साजोगच्या सरपंच पदासाठी अश्विनी देशमुख स्वरूपानंद देशमुख यांचे उमेदवारी अर्ज दाखल

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

मस्साजोग (ता. केज) येथील ग्रामपंचायतीचे सरपंच स्व. संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर रिक्त झालेल्या सरपंच पदाच्या पोटनिवडणूकीसाठी स्व. देशमुख यांच्या पत्नी आणि माजी सरपंच अश्विनी देशमुख यांच्यासह देशमुखांकडून पराभूत झालेले स्वरूपानंद देशमुख यांनी गुरुवारी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. त्यामुळे ही निवडणूक बिनविरोध होण्यावर सध्या तरी प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मस्साजोगचे सरपंच स्व. संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर २०२४ रोजी अपहरण करून निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती. वर्षभरापासून रिक्त असलेल्या सरपंच पदाच्या पोटनिवडणूक लागली आहे. आता सरपंच पदाचा उर्वरित कार्यकाळ हा दीड वर्षाचा असून गावात २ हजार २२८४ मतदार आहेत. तर सरपंच पदाची निवडणूक जनतेतून (मतदारातून) होणार आहे. देशमुख कुटुंबाने ग्रामस्थांचा सल्ला घेत स्व. संतोष देशमुख यांच्या पत्नी स्व. अश्विनी देशमुख यांना उभे करण्याचा निर्णय घेतला आहे. तर ही निवडणूक बिनविरोध काढण्यासाठी प्रयत्न सुरू होते. मात्र स्व. संतोष देशमुख यांच्या विरोधात पराभूत झालेले उमेदवार स्वरूपानंद देशमुख यांनी ही पोटनिवडणूक लढविण्याचा निर्णय घेत गुरुवारी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्याचबरोबर माजी सरपंच अश्विनी देशमुख यांनी तहसीलदार राकेश गिड्डे यांच्या अपघाती निधनामुळे उमेदवारी अर्ज साध्या पध्दतीने दाखल केला आहे. आज उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. उमेदवारी अर्ज भरलेल्या उमेदवारांना उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख २९ एप्रिल असून उमेदवार किती राहतात. यावर निवडणुकीचे चित्र अवलंबून आहे. त्यामुळे या निवडणुकीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष राहणार आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077